**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धीपत्रक**

- **महानगरपालिका वाचनालयासाठी विनामुल्य पुस्तके भेट स्वरूपात देण्याचे आवाहन**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा. प्र. से.) यांच्या मार्गदर्शनाखाली मिरा-भाईंदर शहरात वाचनसंस्कृतीला चालना देण्याच्या उद्देशाने महानगरपालिका वाचनालयासाठी विनामुल्य पुस्तक भेट मोहिम हाती घेण्यात आली आहे.

या उपक्रमाचा उद्देश वाचनालयातील ग्रंथसंपदा समृद्ध करणे आणि शहरातील विद्यार्थ्यांना वाचनीय साहित्य सहज उपलब्ध करून देणे हा आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी किंवा इतर भाषांतील साहित्य, अभ्यासक्रमास पूरक पुस्तके, सामान्यज्ञान, आत्मचरित्रे, विज्ञान, तंत्रज्ञान, इतिहास, साहित्य यासारख्या विविध विषयांवरील पुस्तके स्वागतार्ह आहेत.

मिरा भाईंदर शहरातील ज्येष्ठ पत्रकार अनिल खेडेकर यांनी आपले वडील श्री. आत्माराम कृष्णाजी खेडेकर यांच्या स्मरणार्थ विविध विषयावरील ११३ पुस्तके महानगरपालिकेच्या वाचनालयाला विनामुल्य भेट स्वरूपात दिली आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून शहरातील नागरिक, शिक्षक, विद्यार्थी, पुस्तकप्रेमी ,पत्रकार ,वाचक आणि सामाजिक संस्थांना नम्र आवाहन करण्यात येते की, आपल्या संग्रहातील वाचनीय, ज्ञानवर्धक व चांगल्या स्थितीतील पुस्तके महानगरपालिका वाचनालयाला विनामुल्य भेट स्वरूपात दान करून, एक सामाजिक योगदान द्यावे.

आपल्या छोट्याशा योगदानातून एखाद्या वाचकाचे भविष्य उजळू शकते. त्यामुळे आपल्याकडील वाचण्याजोगे पुस्तके पालिकेस देऊन या महानगरपालिका वाचनालय अधिक प्रगल्भ करावे असे आवाहन मा. आयुक्तांनी केले आहे.